# कीर्तन परंपरा - मूल्यशिक्षणाचे प्रभावी साधन

प्रा. पी. जी. शिंदे
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शहादा जिल्हा नंदुरबार

वर्तमानकाळात मूल्य शिक्षण देण्याचे कार्य शासनानने औपचारिक शिक्षणाकेडे सोपवले आहे. मूल्याचे शिक्षण देण्यासाठी औपचारिक शिक्षणाबोरबरच अनौपचारिक शिक्षण संस्थाही मूल्यशिक्षण देण्यासाठी प्रभाविपणे कार्य करीत आहेत. प्राचीन काळी मूल्य संस्कार करण्याचे कार्य प्रामुख्याने कुटुंब विविध सामाजिक व सांस्कृति संघटना यांच्याकडे सोपवले होते.

समाजातील ज्या संघटनांद्वारा संस्कृती संवर्धन संक्रमण केले जाते त्या संघटनांना सांस्कृतिक संघटना म्हणतात. विविध सांस्कृतिक संघटना प्राचीन काळात व वर्तमान काळात कार्यरत असल्यामुळे या संघटना सांस्कतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढिकडे संक्रमित करण्याचे कार्य करित आहेत. लोकगीते, भजने, कीर्तन, पुराणकथा वाचन यासारख्या कार्यक्रमातून सांस्कृतिक संघटना समाजात मूल्याची जोपासना करण्याचे काम करीत आहे.

## कीर्तन परंपरा व मूल्य शिक्षण

कीर्तन हे लोकजागृतीचे उत्तम साधन आहे. वर्तमानपत्र मासिक व्याख्याने या साधनांचा उपयोग फक्त सुशिक्षित समाजापुरताच मर्यादित असतो. पण अशिक्षीत या सामान्य जनसमूदायाला आत्मकर्तव्याची जाणीव करुन देण्यासाठी कीर्तनाचा चांगला उपयोग होतो म्हणूनच लोकमान्य टिळकांनी म्हटले आहे की,मी वृत्त पत्राचा संपादक झालो नसतो तर कीर्तनकार झालो असतो. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाने या कीर्तन भक्तीस चालना दिली नामदेव महाराज हे आद्य कीर्तनकार होत.

कीर्तनाचे हेतू

१. समान्य माणसाशी संवाद साधणे.

२. समाजाचे धर्म प्रबोधन करणे.

३. समाजा समोर उदात्त जीवन आदर्श ठेवणे व त्याचे अनुकरण करण्याची प्रेरणा देणे.

४. सांस्कृतिक मूल्यांचा नि सांस्कृतिक परंपरेचा परिचय देणे.

५. संताच्या वाड्मयाचा व कार्याचा परिचय करुन देणे.

६. समाजात आधुनिक मूल्याची रुजवणूक करणे.

७. सामाजिक परिवर्तनासाठी व सामाजिक एकात्मतेसाठी समाजमन तयार करणे असे कितीतरी हेतू कीर्तनाचे आहेत.

मध्यमयुगात समाजप्रबोधनासाठी व समाजाच्या नैतिक विकासासाठी संतांनी कीर्तन या माध्यमाचा उपयोग करुन प्रभावीपणे सामाजिक परिवर्तन घडवून आणले. धर्मप्रबोधन व समाजिक प्रबोधनासाठी संत एकनाथ. संत नामदेव व संत गाडगेबाबा सारख्या संतांनी कीर्तनानीच मदत घेतली.

कीर्तन हा महाराष्ट्रतील एक विशेष सांस्कृतिक प्रकार आहे. कीर्तन बहुदा देवळात करतात. कीर्तकाराला हरिनाम किंवा कथाकरीबुवा म्हणतात. कीर्तनकार अंगात शुभ्र पायघोळ अंगरखा घालून बर उपरणे घेतो व डोक्याला पगडी किंवा पागोटे घोलतो. त्यांच्या हातात चिपळ्या किंवा झांज असले. कीर्तनकार संगित, नृत्य, नाट्य आणि कथा यांचा उपयोग करुन तो समाज प्रबोधनात कार्य करतो. लोककथा, लोकगीते, लोककाव्य, लोकसंगीत यांच्या माध्यमातून कीर्तनकार लोकांचे मनोरंजन व उद्‌बोधन करण्याचे काम करीत होते. त्यांचे हे कार्य विनामूल्य स्वरुपाचे होते. कीर्तनकार कीर्तनाची फी म्हणून कोणत्याही प्रकारचे द्रव्य घेत नव्हते. जेथे कीर्तन करावे तेथे अन्न सेवावे अशी त्यांची आदर्श परंपरा होती.

आज प्रलंबित असणाऱ्या कीर्तनाचे मुख्यत: दोन प्रकार आढळतात. नारदीय आणि वरकरी. नारदीय कीर्तनातूनच पुढे एकनाथी, रामदासी, राष्ट्रीय, सामाजिक व सरकारी हे कीर्तनाचे उपप्रकार उगम पावले आणि विकसित झाले. वारकरी कीर्तन मात्र सामान्यत: नामदेवापासून ज्या रुपात प्रचलित झाले त्याच रुपात आजही चालू आहे.

इंग्रजी राजवटीत लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य आंदोलनाचे प्रचार-प्रसार साधन म्हणून कीर्तन माध्यमाकडे पाहिले, लोकमान्य टिळकांनी कार्तनकारांना त्या दृष्टीने प्रेरणा दिली या काळात कीर्तनकारांनी रामायण महाभारत यातील प्रसंग सांगता सांगता इंग्रजी शासनाविरुध्द आवाज उठवला.

संत गाडगेबाबा यांनी समाज प्रबोधनासाठी कीर्तनाची मदत घेतली जातिभेद, अस्पृश्यता, बुवाबाजी, देव-देवस्की आणि हिंदू समाजातील असंख्य भोळ्या-खुळ्या चालीरीती यांच्या विरुध्द समाजमानस जागे करणे हा त्याचा हेतू होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनाने सुध्दा काही सामाजिक प्रश्नाच्या प्रबोधनासाठी कीर्तन परंपरेचाच उपयोग केला कुटुंब नियोजन, हुंडाबळी, जातीयता निर्मूलन, व्यसनमुक्ती इत्यादी चळवळीचा प्रसार कीर्तनाच्या माध्यमातून करुन समाजाला वरील विविध सामाजिक प्रश्नांचे भविष्यात होणारे परिणाम किती भयंकर असतील याची जाणीव करुन समाज प्रबोधन घडवून आणले.

वर्तमान काळात कीर्तन परंपरा कालबाह्य झालेली आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाबू लागले आहे. आज सामाजिक प्रबोधनाची इतर प्रभावी साधने निर्माण झाल्यामुळे कीर्तन ही सांस्कृतिक संघटना नष्ट होईल की काय ? अशी भिती वाटू लागली आहे. कीर्तन परंपरा नष्ट होऊ नये म्हणून पुण्याच्या हरिकीर्तनोत्तेजक सभेने गेल्या शंभर वर्षात अनेक उपक्रम करुन कीर्तनाला प्रतिष्ठा मिळवून दिली. पंढरपूर, देहू, आळंदी यासारख्या धार्मिक ठिकाणी कीर्तनाचे शिक्षण देण्यासाठी वारकरी पंथाने विशेष कीर्तन महाविद्यालयाची स्थापना केलेली आहे.

कीर्तन परंपरेचा हा प्रवाह महाराष्ट्रात शतकानुशतके वाहत आहे. मूल्य शिक्षणातील व समाज शिक्षणातील त्याचे योगदान महान आहे. धर्मप्रबोधन व समाज प्रबोधन व्हावे यासाठी ते एक प्रभावी माध्यम म्हणून प्रचलित झाले आहे. समाज संपन्न व्हावा, सुसंस्कारीत व्हावा यासाठी अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शासकिय, धार्मिक, राजकीय स्तरावरील मूल्याच्या निर्मितीसाठी कीर्तन परंपरा महात्वाची भूमिका पार पाडत आहे. भक्तीभाव, अल्पसंतोष, नि:स्पृहपणा, सेवाभाव, ज्ञान आणि वक्तृत्व इ.गुणांनी कीर्तनकार समाजाच्या उत्कर्षाला उपयुक्त होत आहे. प्रचलित समामाजिक, धार्मिक, राजकीय विषय तसेच पौर्वात्य व पाश्चात्य तत्वज्ञान यांची योग्य सांगड घालून वर्तमान समाजाची आधूनिक युगाकडे वेगाने वाटचाल व्हावी यासाठी कार्य करत आहे.

वर्तमान काळात कीर्तन ऐकण्यासाठी देवळात जाणाऱ्या भक्तांची संख्या कमी झालेली आहे. तरीही कीर्तनकार रेडिओ, दूरदर्शन इ. सारख्या माध्यमातून कीर्तनाद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहे.समाज प्रबोधनासाठीकार्यकरणाऱ्या विविध समाजसेवी संघटना शिवजयंती, गणेशउत्सव इ. प्रसंगी प्रसिध्द कीर्तनकारांचे कीर्तनआयोजित करुन जनसामान्यांना प्रबोधित करीत आहेत. आधुनिक युगात मनोरंजनाची व प्रबोधनाची कितीतरी साधने उपलब्ध झालेली आहे. तंत्रविज्ञानाच्या या आकर्षक व गतिशिल युगात हरिदास व त्यांचे कीर्तन आजही त्यांचे अस्तित्व  टिकवून आहे हेच कीर्तनाचे व कीर्तन परंपरेचे महत्व समजावे.

---------